BJS
Bharatiya Jain Sanghatana

# भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे ४१२ २०७

राज्यशास्त्र विभाग

**संविधान** दिन – अहवाल २०२१-२२

भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतीय जैन संघटनेच्या शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, वाघोली चे प्रमुख व्यवस्थापक श्री. सुरेश साळुंके, महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी, उपप्राचार्य डॉ. किशोर देसरडा, सर्व शाखा व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सिद्धेश्वर सांगोळे यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया व भारतीय संविधानाचे वेगळेपण यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले श्री. सुरेश साळुंके यांनी संविधानामुळे भारतातील शासन-प्रशासनाला मिळणारे अधिकार, नागरिकांना नागरिक म्हणून जगण्यास निकोप व विकास प्रदान करणारी परिस्थिती कशी प्राप्त होते यावर भाष्य केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी यांनी संविधान निर्मितीमध्ये योगदान दिलेल्या संविधान सभा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करून संविधान निर्मितीच्या कार्याचे महत्व विषद केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. ज्योतिराम मोरे यांनी संविधानाच्या तरतुदींच्या पालनाची गरज विषद करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुभाष शिंदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रा. सचिन कांबळे यांनी या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा वाहिली.

सहा. प्रा. सिद्धेश्वर सांगोळे
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र

मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी
प्राचार्य

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७

कार्यक्रमातील क्षणचित्रे (२६/११/२०२१)




कार्यक्रमात उपस्थित मान्यवर




कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७

कार्यक्रमातील क्षणचित्रे (२६/११/२०२१)

 

संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन



संविधान प्रास्ताविकेच्या सामुहिक वाचनात सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७

BJS
Bharatiya Jain Sanghatana

# भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे ४१२ २०७

## राज्यशास्त्र विभाग

## मतदार दिन – अहवाल २०२१-२२

भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून दि. २५ जानेवारी २०२२ रोजी मतदार प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कोविड अनुरूप व्यवहारांचे पालन करून उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात देशातील मतदान प्रक्रियेचा आढावा तसेच प्रत्येक मताचं महत्व याबाबतची मांडणी राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्री. सिद्धेश्वर सांगोळे यांनी केली.

मतदान जागरूकता व मतदान प्रक्रियेतील सक्रीय सहभाग हे राष्ट्राप्रतीचं आपलं उदात्त कर्तव्य आहे यावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसरडा यांनी प्रकाश टाकला.

महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. ज्योतिराम मोरे यांनी मतदार प्रतिज्ञेचे वाचन केले व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. सुभाष शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सहा. प्रा. सिद्धेश्वर सांगोळे
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र

मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी
प्राचार्य

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७

कार्यक्रमातील क्षणचित्रे (२५/०१/२०२२)




कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ. किशोर देसरडा




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. सिद्धेश्वर सांगोळे

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७

कार्यक्रमातील क्षणचित्रे (२५/०१/२०२२)




मतदार प्रतिज्ञेचे सामुहिक वाचन



मतदार प्रतिज्ञा वाचनात सहभागी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

प्राचार्य
भारतीय जैन संघटनेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
वाघोली, पुणे-४१२२०७